**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक - युनिसेफ-२०२३ ( /२०२३)/ पुणे विभाग / 1122 दि. १३/४/२०२३.

**अतिशय महत्वाचे/आजच**

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे व अहमदनगर जिल्हे.**

विषय - **महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त व्रिमाने महाविद्यलयीन युवकांच्या ( Students Youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण/संवर्धन व पाण्याची बचत संयुक्त अभियान राबविणेबाबत..**

संदर्भ -१. मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा.पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/मवि-१/नैसर्गिक संसाधने संवर्धन/२०२२/१४९४९ दि. २२.१२.२०२२.
२. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१२९/विशि-५ दि. १३.१.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र बाल निधी / युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रांची विशेष संस्था आहे. जगभरातील लहान मुलांना अन्न व आरोग्याची सेवा पुरविणे हे या संस्थेचे धेय्य आहे. या उद्दिष्टाचे पुढचे एक पाऊल म्हणून या संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी विषयांकित प्रकरणी समन्वय करार (MOU) केला आहे.

महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयातील युवकांच्या ( Students youth) सहभागाने नैसर्गित संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत राज्यातील १३ निवडक जिल्हयातील वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या युवक/युवतींची पर्यावरण, हवामान बदल आणि पाणी बचत याविषयी माहिती वृध्दिंगत करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण घेणे, शैक्षणिक संस्था स्तरावर ग्रीन क्लबची स्थापना करणे, पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहे. **यामध्ये पुणे विभागातील पुणे व अहमदनगर या २ जिल्हयांचा समावेश आहे.** या अनुषंगाने १३ जिल्हयांसाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. आता त्यानुसार १३ जिल्हयातील शासकीय/अशासकीय/अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये एक **कार्यक्रम अधिकारी (Programme Officer)** यांची नियुक्ती केली जावी व त्याची माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन या कार्यालयास jdhepune@gmail.com या मेलवर व Google form -https://forms.gle/oN8mEz4tXbDM7e927 वर **आजच पाठविण्यात यावी.**

शासकीय / अशासकीय, अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांनी, कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती करतांना त्यामध्ये स्त्री-पुरुष समानता ठेवण्यात यावी तसेच सामाजिक कार्याची आवड असणारा व पर्यावरण/नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, पाण्याची बचत याची जाण असणारे अध्यापक यांना प्राधान्य देण्यात यावे त्यानुसार नियुक्ती करण्यात यावी.

| क्र. | जिल्हयाचे नांव | महाविद्यालयाचे नांव व संपर्क क्रमांक | AISHE CODE | कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | ई-मेल | मो.नं. | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

Circulars Desktop